# महाराष्ट्र- राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,
# पुणे विभागीय मंडळ, पुणे - ४११ ००५

## परिपत्रक क्रमांक पुविमं/उ.मा./पुनर्मुल्यांकन/दि. ३० मे - २०१३

प्रति,

**प्राचार्य/मुख्याध्यापक,**
पुणे विभागीय मंडळाच्या कार्यक्षेत्रातील सर्व मान्यताप्राप्त
उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालये

**विषय :** **माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र/उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षा (इयत्ता १० वी/१२वी) फेब्रुवारी-मार्च २०१३ आणि त्यापुढील परीक्षेच्या उत्तरपत्रिकांचे पुनर्मुल्यांकन करण्याबाबत**

**संदर्भ :**
१) शासनाचे पत्र क्रं. एसएससी २०१२/प्र.क्र.(२७३/१२)/उमाशि-२ दिनांक २९/१२/२०१२ चे आदेश
२) क्र.रा.म./परीक्षा-६/३०६०/दिनांक १५/४/२०१३ चे पत्र
३) क.रा.म./परीक्षा-६/३७१२/दिनांक १८/५/२०१३ चे पत्र

माहे फेब्रुवारी/मार्च २०१३ मध्ये घेण्यात आलेल्या तसेच त्यापुढील घेण्यात येणाऱ्या माध्यमिक शालान्त / उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षेपासून उत्तरपत्रिकेचे पुनर्मुल्यांकन करण्याची सुविधा विद्यार्थ्यांना उपरोक्त संदर्भीय शासन आदेशानुसार विहीत अटी व शर्तीस अधीन राहून उपलब्ध करण्यात आलेली आहे. उत्तरपत्रिकेचे पुनर्मुल्यांकन करण्यासाठी प्रथम उत्तरपत्रिकेची छायाप्रत विभागीय मंडळाकडून घेणे अनिवार्य आहे. छायाप्रत मिळाल्यासपासून पाच दिवसांत पुनर्मुल्यांकनाचा विहीत नमुन्यातील अर्ज विहित शुल्कासह विभागीय मंडळाकडे करणे आवश्यक राहील. ज्या विद्यार्थ्यांना उत्तर पत्रिकेचे पुनर्मुल्यांकन करावयाचे असेल अशा विद्यार्थ्यांना अधिक माहितीसाठी या विभागीय मंडळाकडे संपर्क साधण्याबाबत लेखी सुचित करावे. अटी व शर्ती सोबत नमूद केलेल्या आहेत. सदर अटीस आधिन राहून पुनर्मुल्यांकन योजना कार्यान्वित करण्यात येईल.

**श्रीमती पुष्पलता पवार**
विभागीय सचिव
पुणे विभागीय मंडळ, पुणे - ४११ ००५

## माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ. १० वी) / उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ. १२ वी) परीक्षेच्या उत्तरपत्रिकांचे पुनर्मुल्याकन करण्याबाबतच्या अटी व शर्ती

१. फक्त उत्तरपत्रिकेच्या छायाप्रतीची मागणी करणारे विद्यार्थीच पुनर्मुल्यांकनासाठी अर्ज करु शकतील.

२. पुनर्मुल्यांकनासाठी विद्यार्थ्याने विहित अर्ज स्वहस्ताक्षरात करणे आवश्यक राहील.

३. यासाठी प्रती विषय रु. ३००/- शुल्क मंडळाकडे जमा करावे लागेल.

४. जास्तीत जास्त तीन विषयांच्या उत्तरपत्रिकांचे पुनर्मुल्यांकनासाठी अर्ज करता येईल.

५. पुनर्मुल्यांकनासाठी अर्ज करु इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांनी त्यांना संबंधित विषयाच्या उत्तरपत्रिकेची छायाप्रत घेऊन जाण्याची सूचना मंडळाकडून मिळाल्याच्या तारखेपासून पाच दिवसात संबंधित विषयाची छायाप्रत समक्ष / हस्तपोच घेऊन जाणे बंधनकारक राहील व छायाप्रत मिळाल्यानंतर पाच दिवसाचे आत मंडळाकडे विहित नमुन्यात आपल्या शाळेतील / कनिष्ठ महाविद्यालयातील विषय शिक्षकांकडून उत्तरपत्रिकेची छायाप्रत तपासून घेऊन त्यांच्या स्पष्ट अभिप्रायासह अर्ज करणे आवश्यक राहील.

६. जर शाळेतील/कनिष्ठ महाविद्यालयातील शिक्षक/परिक्षक/नियामक यांना नमुना उत्तरे मिळण्यास अडचण आल्यास संबंधित विषय शिक्षकाने त्याच्याजवळच्या शाळेत/कनिष्ठ महाविद्यालयात संपर्क साधून नमुना उत्तरपत्रिका प्राप्त करुन घ्यावी. अन्यथा संबंधित विभागीय मंडळाकडून प्राप्त करुन घ्यावी.

७. विद्यार्थी केवळ लेखी परीक्षेच्या उत्तरपत्रिकेच्या पुनर्मुल्यांकनासाठी मागणी करू शकतील. तोंडी, प्रात्यक्षिक, अंतर्गत मूल्यमापन व प्रकल्प लेखन किंवा तत्सम उत्तरपत्रिकेचे पुनर्मुल्यांकन करण्याची मागणी करता येणार नाही. तसेच ज्या विषयात दोन पेपर अथवा दोन भाग आहेत. अशा विषयाच्या बाबतीत विद्यार्थ्यांस दोन्ही भागांच्या किंवा पेपरच्या छायाप्रतींची तपासणी त्यांच्या शाळेच्या / कनिष्ठ महाविद्यालयातील शिक्षकांकडून करुन घेऊन त्या दोन्ही पेपरच्या उत्तरपत्रिकेबाबतच्या अभिप्रायासह पुनर्मुल्यांकनासाठी अर्ज करणे बंधनकारक राहील.

८. इ. १०वी व इ. १२वी च्या परीक्षेस खाजगी विद्यार्थी (फॉर्म नं. १७) म्हणून प्रविष्ठ झालेल्या विद्यार्थ्यांनी त्यांच्या उत्तरपत्रिकेच्या पुनर्मुल्यांकनासाठी संपर्क केद्रावरील / आवेदनपत्र सादर केलेल्या शाळा / कनिष्ठ महाविद्यालयातील विषय शिक्षकांकडून अभिप्राय घेवून सदर अभिप्राय अर्जासोबत सादर करावा.

९. संकेतस्थळावरुन प्राप्त करून घेण्यात येणाऱ्या अर्जाचे शुल्क (रु. १०/-) संबंधित विद्यार्थ्यास पुनर्मुल्यांकनाच्या शुल्कासोबत मंडळाकडे जमा करावे लागेल.

१०. परिपूर्ण भरलेला अर्ज विद्यार्थ्यांस किंवा त्याच्या प्रतिनिधीमार्फत मंडळाकडे समक्ष सादर करावा लागेल.

११. उत्तरपत्रिकेचे पुनर्मुल्यांकनाची कार्यवाही खालीलप्रमाणे करण्यात येईल.

अ) वस्तुनिष्ठ प्रश्न (१ किंवा अर्ध्या गुणांचे प्रश्न उदा. रिकाम्या जागा, जोड्या लावा, योग्य पर्याय निवडा, चूक की बरोबर लिहा. इ. प्रकारचे प्रश्न ) वस्तुनिष्ठ प्रश्न पूर्णपणे तपासले जाऊन त्यामध्ये होणारी गुणांची वाढ किंवा घट जशीच्या तशी ग्राह्य धरण्यात येईल.

ब) इतर सर्व प्रश्न गुणात बदल होणाऱ्या उत्तराबाबतचा निर्णय समितीमध्ये बहुमताने मान्य होणे आवश्यक आहे. समान संख्येच्या मतांच्या बाबतीत मुख्य नियामक / समिती प्रमुख यांचा निर्णय अंतिम राहील. त्यामधील वाढ / घट ग्राह्य धरण्यात येवून असे बदल विहित पद्धतीने विभागीय अध्यक्षांच्या मान्यतेने सदर निर्णय अंमलात आणले जातील.

क) याप्रमाणे संपूर्ण उत्तरपत्रिकेचे पुनर्मुल्यांकन झाल्यानंतर संबंधित विद्यार्थ्यास प्राप्त झालेले सुधारीत गुण हे त्याने त्या विषयात अशा प्रश्नांसाठी पूर्वी मिळविलेल्या गुणांच्या (मूळ गुणांच्या) किमान ५% कमी किंवा जास्त असतील तरच सुधारित गुण ग्राह्य धरण्यात येतील. अंन्यथा निकालात कोणताही बदल न करता विद्यार्थ्यांस **'नो चेंज'** कळविण्यात येईल.

ड) वस्तुनिष्ठ प्रश्न वगळता इतर सर्व प्रश्नांचे ५% कमी गुण होत असतील तर त्या प्रश्नांचे वाढीव गुण एकत्रित करुन निकाल लावता येणार नाही.

१२. पुनर्मुल्यांकनामध्ये विद्यार्थ्यांच्या गुणात बदल झाल्यास तसे संबंधित विद्यार्थ्यास व शाळा / कनिष्ठ महाविद्यालयास कळविण्यात येईल, त्यानुसार संबंधित विद्यार्थ्यांने आपले मुळ गुणपत्रक संबंधित विभागीय मंडळाकडे कनिष्ठ महाविद्यालयामार्फत जमा करावे. त्यानंतरच त्यास सुधारित गुणपत्रक त्याच विभागीय मंडळाकडून विनामूल्य देण्यात येईल.

१३. गुणात बदल झालेल्या प्रकरणी फक्त बदल झालेल्या विषयांसाठी विद्यार्थ्याने भरलेले शुल्क परत दिले जाईल.

१४. उत्तरपत्रिकेचे पुनर्मुल्यांकन केल्यानंतर त्यावर होणारा सक्षम समितीचा निर्णय अंतिम राहील व तो विद्यार्थ्यांवर बंधनकारक राहील. त्यानुसार पुनर्मुल्यांकनानंतर संबंधित विद्यार्थ्यांची मूळ संपादणूक आपोआप रद्द होवून सुधारित संपादणूक विद्यार्थ्यास स्विकारावी लागेल. प्राप्त झालेले गुण हे त्याने पूर्वी मिळविलेल्या गुणांच्या (मूळ गुणांच्या) ५% पेक्षा कमी होत असतील तरच ते कमी करण्यात येतील.

१५. अनुत्तीर्ण विद्यार्थ्यांच्या बाबतीत पुनर्मुल्यांकनानंतर त्याच्या मूळ निकालात बदल होत नसल्यास तसेच विषयात उत्तीर्ण होत नसल्यास ५% पर्यंतचा गुणबदल प्रकरणी त्याचा मूळ निकाल कायम ठेवण्यात येवून त्यास **'नो चेंज'** असे कळविले जाईल.

१६. एखाद्या विषयात सवलतीचे गुण मिळवून विद्यार्थी उत्तीर्ण झालेला असेल व अशा विद्यार्थ्याने सवलतीचे गुण मिळालेल्या विषयाच्या पुनर्मुल्यांकनासाठी अर्ज केला व पुनर्मुल्यांकनात विद्यार्थ्याचे ५% इतके कमी गुण कमी झाल्यास सदर विद्यार्थ्याचा निकाल उत्तीर्ण ऐवजी अनुत्तीर्ण असा जाहीर केला जाईल.

१७. पुनर्परिक्षार्थी विद्यार्थ्याने पुनर्मुल्यांकनासाठी अर्ज केल्यास पुनर्मुल्यांकनात वरील नियमानुसार वाढ होत असल्यास व तो उत्तीर्ण होत असल्यास त्यास सवलतीचे गुण देय राहतील. तसेच नियमित विद्यार्थ्याच्या बाबतीतसुद्धा सवलतीचे गुण देय राहतील.

१८. एकदा उत्तरपत्रिकेचे पुनर्मुल्यांकन केल्यानंतर त्याच उत्तरपत्रिकेच्या पुनःश्च गुण पडताळणी, पुनर्मुल्यांकन किंवा छायांकित प्रतीची मागणी करता येणार नाही.

१९. विद्यार्थी पुनर्मुल्यांकनाच्या सुविधेपासून वंचित राहू नये म्हणून संबंधित शाळेच्या/कनिष्ठ महाविद्यालयाच्या मुख्याध्यापक/ प्राचार्य यांनी विषय शिक्षकांकडून उत्तरपत्रिकेच्या छायाप्रतिची तपासणी करुन शिक्षकांचा अभिप्राय प्राप्त करुन घेण्याची त्यांची जबाबदारी राहील.

२०. पुनर्मुल्यांकना संदर्भातील तक्रार निवारण पद्धती ही निकालात सुधार होण्यासाठी विद्यार्थ्यास उपलब्ध करून देण्यात आलेली अतिरिक्त सुविधा असल्यामुळे यानुसार कार्यवाही करीत असतांना निकाल जाहीर होण्यास विलंब झाल्यास त्यामुळे होणाऱ्या संभाव्य परिणामास / शैक्षणिक नुकसानीस मंडळ जबाबदार असणार नाही.

२१. पुनर्मुल्यांकन केलेल्या उत्तरपत्रिकेची छायाप्रत विद्यार्थ्यास दिली जाणार नाही किंवा माहिती अधिकारातही उत्तरपत्रिकेच्या छायाप्रतीची मागणी करता येणार नाही.

२२. दारिद्र्य रेषेखालील विद्यार्थ्यांनाही उत्तरपत्रिकेच्या छायाप्रतीसाठी व पुनर्मुल्यांकनासाठी विहित शुल्क भरावे लागेल.

महाराष्ट्र- राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,
पुणे विभागीय मंडळ, पुणे - ४११ ००५
उत्तरपत्रिकेचे पुनर्मुल्यांकनाबाबतचा विषय शिक्षकाचा अभिप्राय...
माध्यमिक शालान्त / उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षा फेब्रु-मार्च/सप्टें.-ऑक्टोबर २०१.......

| कार्यालयीन उपयोगासाठी | |
|---|---|
| अर्जनोंदणी क्रमांक : | |
| प्रकरण क्रमांक : | |

विषय : ______________ दिनांक : / /२०१

मी ________________________ (शिक्षकाचे पूर्ण नांव) ______________________ (शाळेचे नांव) या शाळा / कनिष्ठ महाविद्यालयात ______________ या पदावर कार्यरत असून इ. १०वी / इ.१२वी साठी ______________ हा विषय शिकवित आहे.

अर्जदार विद्यार्थी हा आमच्या शाळेतील/कनिष्ठ महाविद्यालयातील असून तो माध्यमिक शालान्त / उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षेस फेब्रु.- मार्च/ सप्टें.-ऑक्टो.२०१....... मध्ये ______________ या बैठक क्रमांकान्वये प्रविष्ठ झाला होता. सदर विद्यार्थ्याने मंडळाकडून वरील विषयाच्या उत्तरपत्रिकेची छायांकित प्रत घेतली असून त्यास पुनर्मुल्यांकनासाठी अर्ज करावायाचा आहे त्यासाठी सदर विद्यार्थ्याच्या उत्तरपत्रिकेच्या छायांकित प्रतीची नमुना उत्तरांच्या आधारे मी पुनश्च: तपासणी केलेली असून मला खालील प्रश्नात कमी गुणदान झाल्याचे आढळून येते / गुणदान योग्य झाल्याचे आढळून येते, गुणदान कमी / जास्त झाल्याबद्दल मी खालीलप्रमाणे सकारण अभिप्राय देत आहे.

______________________________________________
______________________________________________
______________________________________________
______________________________________________
______________________________________________
______________________________________________
______________________________________________
______________________________________________
______________________________________________
______________________________________________

उत्तरपत्रिकेच्या छायांकित प्रतीची
पुनश्च: तपासणी करणाऱ्या
विषयशिक्षकाची स्वाक्षरी

प्राचार्य/मुख्याध्यापकाची स्वाक्षरी
(शाळेचा / क.महाविद्यालयाचा शिक्का)

## उत्तरपत्रिकांचे पुनर्मुल्यांकन करण्याबाबतचा अर्ज
## माध्यमिक शालान्त / उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षा
## फेब्रुवारी-मार्च / सप्टें- ऑक्टो २०१........

| |
|---|
| अर्ज शुल्क - रु. १०/- |

| कार्यालयीन उपयोगासाठी | |
|---|---|
| अर्जनोंदणी क्रमांक | |
| प्रकरण क्रमांक | |

प्रति,

**विभागीय सचिव,**
महाराष्ट्र- राज्य माध्यमिक व
उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,
पुणे विभागीय मंडळ,
पुणे - ४११ ००५

महोदय,

मी खालील सही करणार विनंती अर्ज करितो/करिते की, मी फेब्रु.-मार्च/ सप्टें-ऑक्टो. २०१....... च्या माध्यमिक शालान्त / उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षेसाठी खाली नमूद केलेल्या बैठक क्रमांकाने प्रविष्ठ झालो/झाली होतो/होते. सदर परीक्षेच्या माझ्या खालील विषयांच्या उत्तरपत्रिकांचे/उत्तरपत्रिकेचे पुनर्मुल्यांकन करण्यासाठी मी प्रती विषय रु. ३००/- (रु. तीनशे फक्त) प्रमाणे शुल्क भरत आहे. माझा आवश्यक तपशील खालीलप्रमाणे :

| बैठक क्रमांक | परीक्षार्थीचे पूर्ण नाव | शाळा /क.म.वि.सांकेतांक | केंद्र क्रमांक |
|---|---|---|---|
| | | | |

| पिनकोडसह पूर्ण पत्ता | | |
|---|---|---|
| | | |
| | | |
| तालुका : | जिल्हा : | पिनकोड नंबर |
| भ्रमणध्वनी (मोबाईल क्र.) | | |

**उत्तरपत्रिकेचे पुनर्मुल्यांकन करण्याबाबबतचा तपशील :- विषय शिक्षकांच्या अभिप्रायासह उ.प.ची छायाप्रत जोडलेली आहे.**
(संकेतस्थळावरील गुणांची अथवा गुणपत्रिकेची / प्रवेशपत्राची प्रमाणित छायाप्रत (झेरॉक्स) सोबत जोडावी...)

| अ. क्र. | विषयाचे नाव | विषय कोड | उत्तराचे माध्यम | मिळालेले गुण |
|---|---|---|---|---|
| १. | | | | |
| २. | | | | |
| ३. | | | | |

| उत्तरपत्रिकेचे पुनर्मुल्यांकन करण्यासाठी अर्जामध्ये नमूद केलेल्या विषयांची एकूण संख्या | भरलेले शुल्क | शुल्काचा तपशील | | |
|---|---|---|---|---|
| | | चलन क्रमांक | पावती क्रमांक | दिनांक |
| | | | | |

वर दिलेली माहिती खरी असून या अर्जाच्या मागे दिलेल्या अटी / शर्ती व सूचना मी वाचल्या असून त्या मला मान्य आहेत.

दिनांक :

ठिकाण : विद्यार्थ्याची स्वाक्षरी